गोमंतक मराठी अकादमी तर्फे

पं॰ सुरेश हळदणकर यांना

'दीनानाथ स्मृती प्रतिष्ठान' पुरस्कृत

पंडिता लता मंगेशकर पुरस्कार प्रदान सोहळा

प्रमुख पाहुणे

श्री॰ अरुण आठल्ये

यांचे भाषण

पणजी

एप्रिल २४, १९९६

भारतमातेच्या कलानंदनवनात वास्तव्य करण्याचं भाग्य लाभलेल्या रसिकांनो,

गोमंतकाचे एक गुणशाली सुपुत्र पं. सुरेश हळदणकर यांच्या सत्कारार्थ आज आपण येथे आवर्जून उपस्थित झाला आहात. आज एक तिहेरी पुण्ययोग साधला जात आहे. मुळात गोमंतकाचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कलाकार—सुरेलता हाच ज्यांचा स्थायीभाव आहे असे गानसुरेश—त्यांना पुरस्कार प्राप्त झालेला आहे. तोही स्वरांच्या कल्पलता आणि गोमंतकाच्या सुकन्या सूरश्री लता मंगेशकर यांच्या नावाने धन्य झालेला! आणि तो दिला जात आहे मुख्यत: लोकाश्रयावर चाललेल्या गोमंतक मराठी अकादमीतर्फे, या तिहेरी योगाला काय म्हणावे? हा 'दुग्धशर्कराकेशर-योग' आहे असं म्हणू या. त्यातून ज्या गोमंतकात हा योग किंवा त्रिवेणी संगम घडून येत आहे त्याची महती वर्णन करायला एका पौराणिक नाटकाची साक्ष काढली तरी पुरे. 'जय जय गौरीशंकर' या नाटकात नारदमुनी पार्वतीदेवीला सांगतात—

''श्रीशंकराचं वास्तव्य इथंच असलं पाहिजे. कारण वैकुंठाची भावमधुरता आणि इंद्रलोकाची सुंदरता याच गोमंतभूमीत एकवटली आहे; अन्यत्र नाही. येथील कुंजाकुंजात संगीताचे सप्तसूर झंकारत आहेत. विधात्याची सारी रंगकला येथे बहरली आहे! अभिजात कलावंतांची, विचारवंतांची आणि साधुसंतांची ही गोमंतभूमी म्हणजे महान् देश आहे. महान् राष्ट्र आहे!''

गोमंतकाची थोर गान-परंपरा

रसिकहो! खरंच इथला वाराही सुरात वाहतो. इथल्या सरिताही सुरातच खळखळ निनाद करतात. येथील सागराच्या लाटातही तालबद्धता आहे. अनेकानेक थोर गायकगायिकांनी आणि गायनाचार्यांनी शतकानुशतके ही भूमी सप्तसुरांच्या अमृताने सिंचित केली आहे. येथली मूळची रागदारी संगीतपरंपरा बाहेरून आलेली नाही. मृदंग-घुमट-कांसाळे-ताल आणि वीणा-सारंगी यांचे शिक्षण पूर्वकाळी येथेच घराघरातून होत असे. त्यासाठी कोणा उत्तर हिंदुस्थानी गवयाची शागिर्दी तेव्हा करावी लागत नसे. उलट सोहिरोबांसारखे संगीतसंत येथूनच उत्तरेत गेले अशी इतिहासाची साक्ष आहे. ते उत्तर हिंदुस्थानी कलम मराठी भूमीत रुजविण्यामध्ये गोवेकर रेसभरही मागे नव्हते आणि नाहीत. मुरारबा पेडणेकरांसारखे अव्वल विद्वान आणि त्यांच्या तारा बापू आणि सरस्वतीबाई वेलिंगकर या शिष्या ही त्याची ठळक उदाहरणे म्हणून देता येईल. ज्याला हल्ली जयपूर घराणे म्हणतात त्या अल्लादियाखांच्या पट्टशिष्या केशरबाई केरीकर आणि मोगाबाई कुर्डीकर या गोमंतकीयच. आग्रेवाल्यांची परंपरा म्हणून जी सांगतात तिची एक अस्सल वारस चंद्रप्रभा ऊर्फ बाबलीबाई साळगावकर हीसुद्धा गोमंतकीयच. त्या परंपरेचा विस्तार तरी केवढा! ताराबाई आणि दुर्गाबाई शिरोडकर, चंदाबाई नार्वेकर, सरस्वतीबाई फातरफेकर, वत्सलाबाई पर्वतकर, सोनीबाई मुळगावकर—या नामावलीला मुळी समच नाही. भेंडीबाजारवाल्यांची परंपरा अंजनीबाई मालपेकरांनी टिकवली

तर अब्दुलकरीमखांची किराणा परंपरा हिराबाई बडोदेकरांनी जागवली. आणि जिला ग्वाल्हेर परंपरा म्हणतात ती, म्हणजे बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांची परंपरा, महाराष्ट्रात प्रथम उचलणाऱ्या कृष्णाबाई झुलपी याही मूळच्या गोव्याच्याच होत्या. या सर्व परंपरा आपापल्यापरीने एका विशिष्टतेच्या ओघात रुळलेल्या होत्या. त्या सर्व गोधनाचा एक अजब गोपाळकाला करून ज्यांनी आपली परंपरा सर्वसमावेशक केली त्या श्रेष्ठांमध्ये तर्जनीस्थानाचा मान द्यावा लागेल फक्त एकाच गानकौस्तुभाला—त्यांचं नाव होतं मास्टर दीनानाथ.

दीनानाथांची तेजस्विनी गायकी

दीनानाथांचं वैशिष्ट्य तुम्हा गोमंतकीयांना मी सांगणं म्हणजे वाराणशीच्या लोकांना गंगेची महती सांगण्यासारखं आहे. आज त्यांची चौपन्नावी पुण्यतिथी आहे. त्यामुळे त्यांचं पुण्यस्मरण करणं अस्थानी होणार नाही. आजचे आपले सत्कारमूर्ती पं. सुरेश हळदणकर यांच्या संदर्भात ते आवश्यकही आहे. दीनानाथांविषयी खूप लिहिलं गेलं आहे. पण त्यांच्या गायकीचं चपखल वर्णन सुप्रसिद्ध संगीतविमर्शक डॉ. श. वि. गोखले यांनी 'विश्रब्ध शारदा खंड २' (१९७५) मध्ये जे केलं आहे ते केवळ अद्वितीय आहे. ते म्हणतात—

"विजेच्या दिव्याची नक्कल होईल. पण आभाळात कडाडणाऱ्या विजेची नक्कल करणारा कोण आहे?...मुसळधार पावसाची नक्कल कशी होणार? तशीच दीनानाथांची नक्कल होणार नाही. कारण दीनानाथ म्हणजे जिद्द, सार्थ अभिमान, विजिगीषा, चपळाई, सामर्थ्य. बांधून घेणे त्या स्वभावातच नव्हते—मग तो राग असो की ताल असो. रागातालांचे त्याला वावडे होते असे नव्हे. पण त्याचे स्फुरण विलक्षण होते. जुन्यातच तो असे काही करून जाई की ऐकणारा थक्क व्हावा. कोंडलेले पाणी जरा वाव मिळाला की पाट फोडून जोराने खळखळत जावे तसा तो प्रकार असे...केव्हा सर्रकन तान येईल, कोठून कशी जाईल हे कदाचित् त्याचे त्यालाही आधी ठाऊक नसेल...आजकालचे हौशी 'आक्रमक' गायक दीनानाथ नव्हेत. दीनानाथ केवळ आक्रमक नव्हता. केवळ क्रमकही नव्हता. तो दीनानाथ होता. तेज हा त्याचा गुण आणि तीच त्याची मर्यादा! 'लतिका' आणि 'तेजस्विनी' या 'सिंधू' आणि 'सुभद्रा' बनणे अशक्यच होते...आणि म्हणूनच 'मूर्तिमंत तेज' असे बॅ. असफअलींनीही ज्यांचे वर्णन केले त्या सावरकरांना दीनानाथ पटला..."

मित्रहो! दीनानाथांप्रमाणे आपले सत्कारमूर्ती पं. सुरेश हळदणकरही जन्मत:च संगीताचा छंद घेऊन आले. त्याच जातीचा खणखणीत दाणेदार सुरेल तारस्वरमधुर कंठही त्यांना लाभला. गोमंतकाच्या मातीचाच असा काही गुण आहे की येथला कलावंत हा लयीला पक्का असायचाच. सात आणि चौदा मात्रांचे ताल इतरत्र विषम म्हणून आडवळणी, पण गोमंतकात मात्र ते सहज वळणावर येतात. हे वैशिष्ट्य पं. सुरेशरावांमध्येही उतरले.

बालवयात पंडितजींना तबल्याचे विलक्षण आकर्षण होते आणि वडील विनायकरावांकडून पेटीवादनाचेही धडे त्यांना मिळाले. लहानपणी याच महालक्ष्मी मंदिराच्या मंडपात एका श्रावण महिन्यात सुरेशराव गायला बसले. लयभास्कर खाप्रूमामा पर्वतकरांचे सत्शिष्य श्री. मलबाराव सरदेसाई साथीला होते. या मुलाची जरा गंमत करावी म्हणून धुमाळीच्या ठेक्यात त्यांनी एक तुकडा गोवला. पण सुरेशराव लयअवधानाने घारीसारखे समेवर टपकले. पुढे भजनी मंडळीबरोबर सुरेशराव गाऊ लागले आणि सहजस्फूर्त भिंगरी तानांनी भजनात रंग भरू लागले. त्यांचे पाळण्यातले नाव 'अमृत' ठेवणाऱ्यांच्या मार्मिकतेचीच ती पावती होती. गोमंतक ही तर संगीत नाट्यभूमीच! तेव्हा याच मंडपात पुढील वर्षी पंधरा वर्षांच्या अमृतशेट हळदणकरांनी 'एकच प्याला' नाटकात शरदची भूमिका करून सर्वांकडून वाहवा घेतली. 'हा मुलगा पुढे संगीतात नाव काढणार' म्हणून जेथे तेथे त्यांची वाखाणणी होऊ लागली.

दीनानाथांचा एकलव्य—सुरेश

'केशवराव भोसल्यांची तडफ मी उचलली' असं दीनानाथराव अभिमानानं म्हणत. सुरेशरावांनीही दीनानाथरावांना मनोमन आपले गुरू केले आणि एकलव्याच्या निष्ठेने त्यांनी आपली स्वरसाधना चालू ठेवली. दीनानाथांना त्यांनी गोव्यातच पाहिले. ऐकले. मनोमन मानले. त्यानंतर उभयतांचा समक्ष योग आला नाही. पण तेव्हा लाभलेल्या मंगेशकृपेचा वरदहस्तच हळदणकरांनी शिरी धारण केला तो आजन्म. तार झंकारली. तरफ थरारली. दुर्दैवाने तार अकाली मूक झाली. पण तरफेचा झणत्कार दीर्घकाळ घुमत राहिला. बिंब मावळले. पण प्रतिबिंब झांकळले नाही.

दीनानाथांचा सामाजिक अवतार जसा रंगभूमीवरून झाला तसाच अमृतशेट हळदणकरांचाही झाला. पण या नव्या अवतारात शिरतांना त्यांचे नामांतर झाले. अमृतशेटचे सुरेशराव झाले. हे नामांतर पुण्याचे नामवंत बॅरिस्टर कै. बाळासाहेब खासगीवाले यांनी १९४४ साली केले. बॅरिस्टर खासगीवाले म्हणजे एक अजब रसायन होते. मल्ल, नखचित्रकार, महत्त्वाकांक्षी मोटारचालक, उत्कृष्ट सतारवादक, पखवाजप्रवीण, कल्पक आणि उदार हरफनमौला अशी त्यांची ख्याती होती. आपल्या 'महेश नाटक मंडळी'ची कीर्ती गंधर्व कंपनीच्या तोडीची व्हावी अशी त्यांची जिद्द होती. त्यासाठी अत्यंत मधुर आवाजाची मुलं शोधण्याच्या मोहिमेत ते गोव्यात पोंबुरप्याला आले. सतरा वर्षे वयाचा, पांढरी पाचमध्ये गाणारा, तरतरीत गोरापान अमृत त्यांच्या नज़रेत भरला. 'कंपनीत काम करीत असतानाच तू मोठा गवई होशील. त्यासाठी तुला पं. भास्करबुवा बखले यांचे नामवंत शिष्य पं. बापूराव केतकर यांच्याकडून तालीम देववितो' असं आश्वासन त्यांनी अमृतला दिलं. आणि पुण्याला जाताच

ट्रायलमध्ये नाटक कंपनीच्या प्रत्येक साजिंद्यानं ग्वाही दिली—'यह लडका कंपनी का नाम रोशन करेगा. हा तर सुरांचा ईश आहे; सुरेश आहे.' ज्याप्रमाणे सौदागर छोटा गंधर्व हा दामूअण्णा जोशी यांचा मानसपुत्र ठरला तसेच बॅ. बाळासाहेब खासगीवाले हे पं. सुरेश हळदणकरांचे कर्तेकरविते शिल्पकार ठरले. पुढील आयुष्यात बाळासाहेबांनी आपल्या या मानसपुत्रासाठी जे जे केले त्याला इतिहासात तोड नाही.

'महेश नाटक मंडळी'चे गायनमास्तर पं. बापूराव केतंकर हे होते. त्यांची खास शिकवणी सुरेशरावांना मिळाली. खासगीवाल्यांनी एकंदर तीन नाटके लिहिली. मास्तर कृष्णरावांच्या चालींमुळे जसे 'कुलवधू' नाटक रंगले तशीच रंगत आपल्या 'खलवधू' या नाटकात आली पाहिजे म्हणून संगीतनियोजनासाठी त्यांनी रसिकाग्रणी गोविंदराव टेंब्यांची नियुक्ती केली. गोविंदरावांनी सुरेशरावांना आपण होऊन सुमारे पन्नास बंदिशी शिकवल्या. इतकेच नव्हे तर रंगभूमीवर गाणे कसे सजवावे याचीही प्रात्यक्षिके दिली. 'गाण्याशी आपलं लग्न लागलंय असं समजून वाग' असा कानमंत्र दिला. 'महेश नाटक मंडळी'त असताना पं. सुरेशरावांनी जे संचित जमा केले आणि त्यायोगे भावी काळातील आपली व्यवच्छेदक गायकी सिद्ध केली त्याचा परामर्श घेणे येथे अस्थानी ठरणार नाही.

विविध गानशैलींचे संस्कार

ज्यांचा खर्ज ऐकण्यासाठी स्वत: रहिमतखां पुढे येऊन बसत असत त्या बळवंतराव केतकरांचे पं. बापूराव नातू होते. ते अब्दुलकरीमखांकडे काही वर्षे राहून नंतर भास्करबुवा बखल्यांकडे शिकले. दत्तोबा बागलकोटकरांनंतर भास्करबुवांच्या भारत गायन समाजाची धुरा पं. बापूरावांनीच उचलली. भास्करबुवांचे पट्टशिष्य मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर हेही पं. बापूरावांना मानीत. आणि गोविंदराव टेंब्यांनी संगीताचा व्यासंग किती विविधांगांनी केला ते त्यांनीच स्वत: लिहून ठेवले आहे. गोविंदराव भास्करबुवांना मनोमन गुरूच मानीत असत. अशाप्रकारे भास्करबुवांच्या परंपरेचे म्हणजे पैसारंग-घसीटखां-फैझमहमदखां यांच्या पीळदार ठायगंभीर एकसंध अस्ताईचे, नत्थनखांच्या उपज-बोलउपज-बोलतानांचे आणि अन्वययोगाने अल्लादियाखांच्या आडलयीच्या खानेपुरीच्या फिकऱ्यांचे शिक्षण पं. सुरेशरावांना लाभले. १९४५ साली वयाच्या अवघ्या एकोणीसाव्या वर्षी एच्‌एम्‌व्ही कंपनीने घेतलेली सुरेशरावांची शंकरा रागातली, जलद तीन तालातली 'लाई रे तान तलवार' ही ध्वनिमुद्रिका, त्यांना गोविंदराव टेंब्यांनी जी तालीम दिली त्याची साक्ष देईल. तिच्यातले लयसातत्य आणि दूनी, हरकत, फिरकी, चलावघुमाव, गमक या जातींच्या ताना टिपण्यासारख्या आहेत. गमकासंगे जबड्याची तान घेण्याचाही प्रयत्न त्यात यशस्वी झाला आहे. भास्करबुवांची खासियत म्हणजे जे अखंड लयदार नादसातत्य ते या ध्वनिमुद्रिकेत स्पष्टपणे दृग्गोचर होते.

गोविंदराव टेंब्यांनी सुरेशरावांना नाट्यसंगीतासाठी जे मार्गदर्शन केले त्यात घुमारा आणि गमक यांचे महत्त्व पटविणे हा एक भाग होता. शब्द कोठे तोडावे याची काटेकोर पथ्ये होती. बोलतानेत शब्दोच्चाराचे औचित्य ठेवण्याचा भाग होता. ही शिकवण पं. सुरेशरावांनी कशी पचविली त्याची साक्ष 'विमल अधर' आणि 'सुरसुखखनि तू विमला' या ध्वनिमुद्रिका देतात. तरीही राहून राहून असे जाणवते की या सर्व घरंदाजपणामध्ये बालपणी संस्कार घडलेला 'दीनानाथस्पर्श' कोठेतरी पार्श्वसंगीताप्रमाणे निनादत आहे.

न्यायमूर्ती लोकूर यांच्या सांगण्यावरून 'महेश नाटक मंडळी' जरी बंद झाली, तरी बॅ. खासगीवाल्यांनी पं. सुरेशरावांना नामवंत गायक बनविण्याचे आपले प्रतिज्ञाकंकण सोडले नव्हते. सुरेशरावांना मुंबईत मास्टर मनहर बर्वे यांची तालीम त्यांनी सुरू केली. मनहरांचे वडील गणपतराव हे मौलाबक्षांचे शिष्य आणि उमडेकरबुवा-मीनप्पा व्यंकप्पा वगैरेंचे गुरुबंधू होते. मौलाबक्षांची परंपरा मूळची घसीटखांचीच, पण तिच्यात काही 'शास्त्रोक्तपणा' त्यांनी घातला होता.

आपल्या तानतयारीने सुरेशराव एव्हाना मैफिली गाजवू लागले होते. पं. जगन्नाथबुवा पुरोहितांनी कोल्हापूरच्या देवल क्लबात सुरेशजींना ऐकले आणि पं. राम मराठ्यांसमवेत त्यांनी सुरेशजींनाही तालीम द्यायला सुरवात केली. पं. जगन्नाथबुवा पुरोहित हे मूलतः पट्टीचे तबलावादक. त्यांनी हैदराबादेत तानरसखां-परंपरेचे शब्बूखां यांच्याकडून विद्या घेतली होती. तिच्यातले बिकट जलद पलटे सुरेशरावांनी उचलले. तानरसखांचे पलटे शब्दाच्या अंगाने जात. ते वैशिष्ट्यही त्यांनी टिपले. याच शब्बूखांचा सहवास थोडा काळ का होईना, मास्टर दीनानाथांनाही मिळाला होता. आणि दीनानाथ तर पाच मिनिटातच पुरा गवई स्वतःच्या कंठात रिचवीत असत! शब्बूखां हा दीनानाथ आणि सुरेशराव यांच्यामधला आणखी एक भक्कम दुवा ठरला. पं. जगन्नाथबुवा पुरोहित हे विलायतहुसेनखांचे लाडके शिष्य होते. ढंगदार बोलताना हे त्यांच्या गायकीचे खास वैशिष्ट्य होते. पं. बापूराव केतकर आणि गोविंदराव टेंबे यांचीही तीच खासियत होती. त्यामुळे पं. सुरेशरावांच्या पूर्वार्जितात डोळस भर पडली.

''तू साक्षात् रंगदेवताच''

दुसऱ्या महायुद्धानंतर आणि चित्रपटांच्या आक्रमणामुळे मराठी संगीत रंगभूमीवरील नावाजलेल्या कंपन्या जरी धडाधड बंद होत होत्या तरी ठेकेदारी पद्धतीवर नाट्यप्रयोग चालूच होते. १९४८च्या सुमारास दादरच्या टिळक ब्रिजजवळ 'श्रीनंद' नावाचे एक मंडपातले थिएटर होते. तिथं एकदा कंत्राटदारांनी 'सौभद्र'चा प्रयोग लावला. त्यात बालगंधर्व (अर्जुन), गोहरबाई (सुभद्रा), गोविंदराव टेंबे (कृष्ण) आणि सुरेशराव (नारद) झाले होते.

त्यादिवशी सुरेशरावांनी बालगंधर्वांना आपले गुरू केले आणि बालगंधर्वांनीही सुरेशरावांना 'आपला' मानून जवळ केले. या नात्याचे वर्णन अपंग देव आणि धाकट भक्त असेच करावे लागेल. बालगंधर्वांचे गाणे असले आणि सुरेशराव दूर दिसले तर ते त्यांना म्हणत— ''अरे सुरेशा! असा समोर येऊन बैस रे! तू म्हणजे साक्षात् रंगदेवता आहेस!''

बालगंधर्वांचे गाणे म्हणजे निखळ सौंदर्यानुभव. आपल्या गोव्याच्या भाषेत बोलायचे तर बालगंधर्व म्हणजे मूर्तिमंत 'नकसूद!' ती नकसूद सुरेशरावांच्या रोमारोमात कशी भिनली त्याची साक्ष त्यांच्या 'विठु माझा लेकुरवाळा' आणि त्याहूनही अधिकपणे 'अच्युता अनंता श्रीधरा' या ध्वनिमुद्रिकांतून बघावयास मिळते. घण्घण् गजरासारखा लयीचा आंदोलित अखंडपणा, शब्दोच्चारांच्या शुद्धते-स्पष्टतेबरोबरच मोहक लडिवाळपणा, स्वरांना गोंजारीत वळवण्याफिरवण्यातला सहजपणा, पुकारातील आर्तता हे सारे गंधर्वगुण त्या भजनांत दिसतात. 'माऽझा', 'वाऽळा' यातील तो गंधर्व-'आ'कार त्यात स्पष्टपणे प्रतीत होतो.

गोविंदराव टेंब्यांच्या शिफारसीने १९५३-५४ मध्ये सुरेशरावांना मोहनराव पालेकरांची तालीम सुरू झाली. पालेकरांकडून कित्येक घरंदाज अस्ताई अंतरे, दुर्मिळ अछोप राग आणि मिश्रराग त्यांना मिळाले. हमीरबसंत, कौसीबसंत असे एकेका रागाचे मिश्रप्रकार त्यांनी हस्तगत केले. मोहनराव हे अल्लादियाखांच्या मूळच्या घराण्यातील अहंमदभैय्यांचे शिष्य. त्यांच्याकडून उलझाव, घसीट, चुनाचुनी, बेहलावा, लडगुत्थी, खेंच, मींड इत्यादी तानप्रकार सुरेशरावांच्या गळ्यावर आरूढ झाले. पुढे १९५५ मध्ये रजबअली आणि हैदरखां यांचे शिष्य गणपतराव देवासकर यांची सुरेशरावांना अनाहूत तालीम हासिल झाली. ते तंत अंगानं नोमतोम करीत असा त्यांचा लौकिक होता. त्यांच्या जरबी फिक्रेबाजीचा सुरेशरावांवर प्रभाव पडला. दमसास टिकवणारी तनायत देवासकर वेगळ्या पद्धतीनं शिकवीत. ते बागेत या झाडापासून त्या झाडापर्यन्त सावकाश चालत जात. तोपर्यन्त तान तुटता उपयोगी नाही असा त्यांचा सक्त हुक्म असे. देवासकरांच्या अजस्र अफाट लयीला सुरेशराव टिकून उरले हे त्यांच्या सावनीनट, रायसा-कानडा इत्यादींच्या जिवंत ध्वनिमुद्रणामुळे प्रत्ययाला येते. या सर्व तालमीचा फायदा सुरेशरावांना मैफिलीत आणि रंगभूमीवर हुकमी रंगत आणण्याच्या कामी झाला.

रंगभूमीवरील धवल यश

संगीत रंगभूमीवर आपल्या उमेदीत पं. सुरेशरावांनी एकूण पंधरा नाटकांत अठरा भूमिका साकार केल्या. मुंबई मराठी साहित्य संघाच्या विद्यमाने होणाऱ्या नाट्योत्सवात त्यांनी लागोपाठ तीन वर्षे विद्याहरण (कच), प्रेमशोधन (नंदन) आणि कुंजविहारी (नारद) या नाटकात भूमिका करून तूफान लोकप्रियता संपादन केली. या नाटकांतून अभिनयाचे धडे

त्यांना नटवर्य गणपतराव बोडस यांच्याकडून मिळाले. तथापि संगीत रंगभूमीवर पं. हळदणकर चिरस्थायी झाले ते त्यांच्या 'होनाजी बाळा' या नाटकातील होनाच्या भूमिकेमुळे. ती भूमिका पाहून 'सुरेश, ही भूमिका केवळ तुझ्यासाठीच' असं रसिकश्रेष्ठ रामूभैय्या दाते सहजस्फूर्ततेनं म्हणाले. असा होना अजून रंगभूमीवर झाला नाही, यावर सर्व नाट्यसमीक्षकांचे एकमत आहे. किंवा आपण असे म्हणू या की निरागस, पापभीरू व सत्त्वशील आणि तरीही कलामग्न अशा होनाजीच्या भूमिकेशी सुरेशरावांची मूलभूत पिंडप्रकृती १०० टक्के जुळली! अलिकडील काळात मराठी संगीत रंगभूमीवर एवढा स्वरूपवान, देखणा नट अद्यापि झालेला नाही. देखणे नसूनही स्त्रीमोहाला बळी पडलेले अनेक नाट्यनवाझ दाखवून देता येतात. पण देखणे आणि त्यातही सुरेल असूनही यौवनसुलभ मोहाला बळी न पडलेले सुरेशरावांसारखे कलावंत फक्त अनामिकेलाच सार्थवती करतात! भांगेच्या वनातील साक्षात् तुलसीवृक्षच म्हणा ना! सुरेशरावांनी नाट्यव्यवसायात असूनही मदिरेला तर राहोच पण साध्या चहा-कॉफीलाही आपले ओठ अद्यापि लावलेले नाहीत आणि गोमंतकातले असूनही ईश्वराच्या प्रथमावताराला म्हणजे मत्स्याहारालादेखील त्यांनी हात लावलेला नाही ही गोष्ट गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्‌मध्ये नोंदण्यासारखी आहे! रंगभूमीच्या विश्वात 'कर हा करी धरिला शुभांगी' हे पद म्हणतानाच काय तो या आश्विनशेटने परस्त्रीला निसटता करस्पर्श केला असेल! त्यांनी गाजविलेल्या मानापमानातील एका पदात 'रमणीमनहंसा, नरसाहससरसीं रमवी' अशी ओळ आहे. (रमणीचे मन ही जणू राजहंसी आहे. तिला पुरुष साहससरोवरात रमवितो असा तिचा अर्थ.) पण कोणत्याही रमणीला साहस सरोवरात न रमविणारा राजहंस म्हणजे पं. सुरेश हळदणकर आहेत! त्यांच्या सर्व विद्यार्थिनी प्रांजळपणाने सांगतात की असा धुतल्या तांदळासारखा निष्कलंक आणि चारित्रवान् गुरू मिळणे ही भाग्याची गोष्ट आहे.

महाराष्ट्र गंधर्व

'पं. सुरेश हळदणकरांच्या गाण्यात मला भाऊराव कोल्हटकर यांच्या आवाजीचा पुनःप्रत्यय येतो' असं गोविंदराव टेंबे निक्षून सांगत. 'सुरेश, आज तुम्ही केशवराव भोसल्यांची आठवण करून दिलीत' असं विख्यात नट रामभाऊ गुळवणी इंदूरला सुरेशजींना म्हणाले. 'शूरा मी वंदिले' हे दीनानाथांचे पेटंट पद पुण्यात श्रीशिवाजी मंदिरात सुरेशजींनी सुरू करताच संगीत दिग्दर्शक दादा चांदेकर दीनानाथांची आठवण येऊन ढळढळा रडू लागले. बेळगावला त्यांचे 'श्रीरंगा कमलाकांता' ऐकून आचार्य अत्र्यांनी सुरेशरावांना 'महाराष्ट्र गंधर्व' ही पदवी बहाल केली. पुणे नभोवाणीवर मूळच्या 'गीतरामायणा'त लक्ष्मणाची सर्व पदे म्हणण्याचा मान त्यांना मिळाला. पाच मराठी चित्रपटांतही त्यांनी पार्श्वगायन केले. गोमंतक

स्वतंत्र झाले तेव्हा राष्ट्रगीत म्हणण्यासाठी पं. सुरेशरावांनाच पाचारण करण्यात आले. दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्र शासनाचा 'बालगंधर्व पुरस्कार' त्यांना मिळाला. आजही शास्त्रीय संगीत असो की सुगम संगीत असो, नाट्यसंगीत असो की स. अ. शुक्लांची गाणी असोत, पं. सुरेश हळदणकर यांच्या तासीरदार, हृदयाचा ठाव घेणाऱ्या आवाजाची प्रत्येकाला हमखास आठवण येते. संगीताच्या कोणत्याही स्टेडियमवर हा आघाडीचा फलंदाज नेहमी शतकवीरच ठरत आलेला आहे. मग ती रागदारी ख्यालगायकीची पाच दिवसांची ऐसपैस टेस्ट मॅच असो की नाट्यसंगीताची मर्यादित षटकांची वन-डे मॅच असो. आणि सुरेशरावांची नाट्यसंगीतातील तीन मिनिटांची ध्वनिमुद्रिका म्हणजे तर एकाच षटकात त्यांनी केलेली नेत्रदीपक चौफेर टोलेबाजी असेच म्हणावे लागेल!

आज 'दीनानाथ स्मृती प्रतिष्ठान' पुरस्कृत 'पंडिता लता मंगेशकर पुरस्कार' पं. सुरेश हळदणकरांना त्यांनी आजवर केलेल्या शास्त्रीय-सुगम-नाट्य-संगीताच्या योगदानासाठी देण्यात येत आहे. महाराष्ट्रगंधर्व सुरेशजी हे जेवढे गंधर्वशिष्य तेवढेच दीनानाथगुणान्वयीही आहेत. आज वयपरत्वे त्यांचे गाणे थांबले असले तरी मुंबईतील ब्राह्मणसभेच्या एका गणेशोत्सवात सुरेशजींनी म्हटलेल्या 'युवती मना'चे रेकॉर्डिंग आज सुदैवाने उपलब्ध आहे. ते आपल्याला आत्ता मुद्दाम ऐकविण्यात येईल. त्यावरून माझी खात्री आहे की या मंडपातला प्रत्येक कोनाकोपरा उत्स्फूर्त दाद देईल की 'यह तो दीनानाथही है!' उचक, उछल, उड्डान, चक्करछलांग, छूट, तलवारकाट, फुलझडी, फेक, बादल, हिचक, सरपट हे सगळे तानप्रकार त्या 'युवती मना'त दाटीवाटीने एकवटलेले आहेत. बारा सुरांची अंतःश्रुतींसह उतरती घसरण त्यांनी एकदाच नव्हे तर तीनवार वाढत्या रंगतीने घेतली आहे. तार षड्जाच्या टीपेपर्यन्त आवाज चढवला आहे आणि तोही गोडवा कायम राखून. हे पद पालापाचोळ्यासकट वर्तुळाकार गिरगिरत अंतरिक्षात लुप्त होणाऱ्या वातचक्राची तुम्हाला आठवण करून देईल! हे दर्शन घडत असताना दीनानाथ स्मृती व्हावी आणि त्या घडवणाऱ्याला स्वरसम्राज्ञीचा पुरस्कार प्राप्त व्हावा हा नादब्रह्मातील कैवल्ययोग आहे. अमृतनामक सुरेश हळदणकरांच्या आयुष्यातील हा अमृतसिद्धीयोग आहे. ही लहानशी टेप आपल्याला ग्वाही देईल की—

खंडहर बता रहा है कि इमारत बुलंद थी।

मी पं. सुरेशजींना दीर्घायुरारोग्य चिंतितो आणि सौ. कलावती हळदणकरांची साथ त्यांना सदैव लाभो अशी त्या महालक्ष्मीचरणी प्रार्थना करतो.

परिशिष्ट 'अ'

पं. सुरेश हळदणकर यांची १५ नाटके आणि १८ भूमिका

क्रम	नाटक	नाटककार	भूमिका
१	प्रतिज्ञाकंकण	माधव आप्पाजी कामत	बाळ शिवाजी
२	एकच प्याला	राम गणेश गडकरी	शरद
३	रजनीविलास	बॅ. अनंत हरिहर खासगीवाले	सुहास
४	कृष्णकारस्थान	निळकंठ चिंतामण गद्रे	नारद
५	खलवधू	बॅ. अनंत हरिहर खासगीवाले	नायक
६	सौभद्र	बळवंत पांडुरंग किर्लोस्कर	नारद, अर्जुन, कृष्ण
७	संशयकल्लोळ	गोविंद बल्लाळ देवल	जलशातील गवई आश्विनशेट
८	विद्याहरण	कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर	कच
९	प्रेमशोधन	श्रीपाद कृष्ण कोल्हटकर	नंदन
१०	कुंजविहारी	भार्गवराम विठ्ठल वरेरकर	नारद
११	जयजयकार!	मोतिराम गजानन रांगणेकर	राजा
१२	होनाजी बाळा	चिंतामणी यशवंत मराठे	होना
१३	शारदा	गोविंद बल्लाळ देवल	कोदंड
१४	मानापमान	कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर	धैर्यधर
१५	सुवर्णतुला	विद्याधर संभाजीराव गोखले	कृष्ण

परिशिष्ट 'ब'

पं. सुरेश हळदणकर यांच्या उपलब्ध ध्वनिमुद्रिका

क्रम	कंपनी	कंपनी क्रमांक	तपशील	मॅट्रिक्स क्रमांक
१	कोलंबिया	अ) GE 3660	ती कधी होई कां महेश नाटक मंडळी नाटक : खलवधू संगीत : गोविंदराव टेंबे कवी : ए. एच्. खासगीवाले बार-अॅट-लॉ	CEI 26342
		ब) GE 3660	हेतु थोर साध्य होत महेश नाटक मंडळी नाटक : ब्लॅक मार्केट संगीत : बापुराव केतकर कवी : ए. एच्. खासगीवाले, बार-अॅट-लॉ	CEI 26343
२	कोलंबिया	अ) GE 3661	विरस मम मानसाचा महेश नाटक मंडळी नाटक : रजनीविलास संगीत : बापुराव केतकर कवी : ए. एच्. खासगीवाले, बार-अॅट-लॉ	CEI 26344
		ब) GE 3661	मोह हा मज बालिकेचा महेश नाटक मंडळी नाटक : रजनीविलास संगीत : बापुराव केतकर कवी : ए. एच्. खासगीवाले, बार-अॅट-लॉ	CEI 26345

क्रम	कंपनी	कंपनी क्रमांक	तपशील	मॅट्रिक्स क्रमांक
३	कोलंबिया	अ) GE 3812	हसती या उपहासें तारा कवी : स. अ. शुक्ल	CEI 30063 22/7/1946
		ब) GE 3812	डौल तुझा मोहक प्यारा कवी : स. अ. शुक्ल	CEI 30064 22/7/1946
४	कोलंबिया	अ) GE 3918	जिवाला का जिंकियले कवी : स. अ. शुक्ल	CEI 21596 10/10/1946
		ब) GE 3918	जादूगार नयन तुझे कवी : स. अ. शुक्ल	CEI 24196 2/12/1946
५	एच्एम्व्ही	अ) N 25021	रघुराज मनिं वदनीं दिसला कवी : स. अ. शुक्ल	OMP 1368 9/7/1947
		ब) N 25021	भारत माझा देवधर्म राजा कवी : स. अ. शुक्ल	OMP 1369 9/7/1947
६	एच्एम्व्ही	अ) N 25057	पतित पावन नाम विठ्ठलाचे भजन	OMR 477
		ब) N 25057	दिसे स्वरुप हे किती मनोहर भजन	OMR 478
७	एच्एम्व्ही	अ) N 25111	ललना देवता नाटक : जग काय म्हणेल कवी : आचार्य अत्रे	OML 5333
		ब) N 25111	हांसरा चंद्रमा नाटक : जग काय म्हणेल कवी : आचार्य अत्रे	OML 5334
८	एच्एम्व्ही	अ) N 25254	सुरसुखखनि तू विमला नाटक : विद्याहरण कवी : कृ. प्र. खाडिलकर	OJW 501
		ब) N 25254	विमल अधर नाटक : विद्याहरण कवी : कृ. प्र. खाडिलकर	OJW 503

क्रम	कंपनी	कंपनी क्रमांक	तपशील	मॅट्रिक्स क्रमांक
९	एच्एम्व्ही	अ) N 35527	गिनत रही तारे—खंबावती	OML 4962
		ब) N 35527	लाई रे तान तलवार—शंकरा	OML 4963
१०	एच्एम्व्ही	अ) N 89002	रघुराजा हा माझा कवी : स. अ. शुक्ल	OJW 505 7/1/1952
		ब) N 89002	विठु माझा लेकुरवाळा	OJW 1671 7/1/1952
११	एच्एम्व्ही	अ) N 89014	फुलपांखरा कवी : स. अ. शुक्ल	OJW 506 7/1/1952
		ब) N89014	प्रीतीचा संसार कवी : स. अ. शुक्ल	OJW 1672 7/1/1952
१२	एच्एम्व्ही	अ) N89030	विठ्ठल गीती गावा	OJW 2555
		ब) N 89030	अच्युता अनंता श्रीधरा	OJW 2556
१३	एच्एम्व्ही	अ) N 89100	श्रीरंगा कमलाकांता नाटक : होनाजी बाळा गवळण	OJW 3941
		ब) N 89100	मानिली आपुली नाटक : संशयकल्लोळ कवी : गो. ब. देवल	OJW 3942
१४	एच्एम्व्ही	अ) N 89127	गोविंदा रे गोपाळा रे कवी : योगेश्वर अभ्यंकर	OJW 4506
		ब) N 89127	श्री अनंता मधुसूदना कवी : संत तुकाराम	OJW 4507

परिशिष्ट 'क'

पं. सुरेश हळदणकर यांनी गायिलेली मराठी चित्रपटातील गाणी (१९४८-१९६३)

१. **मोरूची मावशी (कृष्णधवल)**
निर्मिती संस्था : अत्रे पिक्चर्स
साल : १९४८
गीते : आचार्य प्र. के. अत्रे
संगीत : दादा चांदेकर
ध्वनिमुद्रिका : एच्‌एम्व्ही
तू थंडगार पहाटेची झुळुक गोड गडे वाऱ्याची HMV N 25099
त्याकाळच्या प्रथेप्रमाणे ध्वनिमुद्रिकेवर वा हस्तपुस्तकात पं. हळदणकर यांचा उल्लेख नाही. पण एच्‌एम्व्हीच्या कागदपत्रात ही माहिती नोंदलेली आहे.

२. **क्रांतिवीर वासुदेव बळवंत (कृष्णधवल)**
निर्मिती संस्था : सुप्रीम पिक्चर्स-विश्राम बेडेकर प्रॉडक्शन
साल : १९५०
गीते : शंकर शास्त्री
संगीत : वसंत देसाई
अ) हे प्रलयंकर शंखशूलधर हे देवांच्या देवा—सोलो आणि
ब) श्री शिवशंकर बन प्रलयंकर—हे द्वंद्वगीत पं. हळदणकर यांनी विनोदिनी दीक्षितबरोबर गायिले आहे.
ध्वनिमुद्रिकांबद्दल कोणताही तपशील उपलब्ध नाही.

३. **अमर भूपाळी/कवि होनाजी बाळा (कृष्णधवल)**
निर्मिती संस्था : राजकमल कलामंदिर
साल : १९५१
गीते : शाहीर होनाजी/अमर शेख
संगीत : वसंत देसाई
पाऊस पडतो आहे रात्र सख्या अंधारी
भिजते तुजसाठी एकाकी उभी मी दारी
ही लावणी चित्रपटात पं. हळदणकरांनी गायिली आहे.
ध्वनिमुद्रिका काढलेली नाही.

हा चित्रपट बंगाली भाषेत डबिंग करून पश्चिम बंगालमध्ये प्रदर्शित केला होता. त्यावेळी हीच लावणी पं. हळदणकरांनी बंगालीतूनही गायिली होती.

४ अबोली (कृष्णधवल)

निर्मिती संस्था : आल्हाद चित्र, पुणे

साल : १९५३

गीते : ग. दि. माडगूळकर

संगीत : वसंत पवार, राम वढावकर

अ) मी वाजवीन मुरली वृक्षी बसोनि ऐका
होऊनिया मुकी तू वाळूत काढ रेखा

हे गीत पं. हळदणकरांनी प्रकाश बेळगावकर यांच्याबरोबर युगलगान म्हणून म्हटले आहे. राग हंसध्वनी आहे.

ब) रिमझिम करी बरसात मेघा गात गात मल्हार

हे गीत सोलो म्हणून पं. हळदणकरांनी गायिले आहे. राग मल्हार आहे.

ध्वनिमुद्रिकांबाबत कोणताच तपशील उपलब्ध नाही.

५. छोटा जवान (कृष्णधवल)

निर्मिती संस्था : सुबोध चित्र

साल : १९६३

गीते : ग. दि. माडगूळकर

संगीत : वसंत देसाई

ध्वनिमुद्रिका : एच्एमव्ही

जेजुरीसम पुण्यक्षेत्र नाही या जगती HMV N 62411

दोन भागातील साडेसहा मिनिटांच्या या गीतात सुलोचना चव्हाण, आप्पा इनामदार, शाहीर साबळे आणि पार्टी, सुरेश हळदणकर व कोरस् इतके आवाज आहेत. चित्रपटाच्या हस्तपुस्तिकेत तसा उल्लेख आहे.

संदर्भ :

१. चित्रशारदा—मराठी चित्रपटांची सूची (१९३२ ते १९८१)
कै. भास्करराव धारप (१९८२)

२. मराठी चित्रपटांची समग्र सूची (१९३२ ते १९८९)
संपादन-संकलन : शशिकांत किणीकर (१९८९)

३. श्री. विश्वास नेरूरकर यांचा चित्रपट हस्तपुस्तिकांचा संग्रह

४. सर्वश्री प्रभाकर दातार, सुरेश चांदवणकर, अशोक ठाकूरदेसाई यांच्याशी संभाषण पत्रव्यवहार.